पान १ वरून

## सरकारची शिष्टाई यशस्वी, ...

यांच्या उपस्थितीत उपोषण सोडले होते. परंतु दिलेल्या वेळेत आरक्षण न मिळाल्याने जरांगे-पाटलांनी पुन्हा एकदा सरकारच्या विरोधात शड्डू ठोकत २५ ऑक्टोबरपासून अंतरवाली सराटी येथे आमरण उपोषण सुरू केले होते. या उपोषणात त्यांनी वैद्यकीय उपचारही नाकारले होते. केवळ मान्यवरांच्या आग्रहाखातर पाण्याचे काही घोट घेतले होते. शेवटच्या टप्प्यात त्यांनी पाणीही नाकारले होते. दरम्यान, राज्यात ठिकठिकाणी मराठा आंदोलन चिघळल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता. अखेर गुरुवारी जरांगे-पाटलांनी न्या. गायकवाड, न्या. निरगुडे यांच्यासह मंत्रीगटाशी चर्चा केल्यानंतर सरकारला सरसकट आणि कायद्यात टिकणारे आरक्षण देण्याच्या अटीवर आमरण उपोषणाचा निर्णय मागे घेतला. तत्पूर्वी बुधवारी माजी मंत्री बच्चू कडू यांनी उपोषणस्थळी येऊन जरांगे-पाटील यांच्याशी चर्चा करून मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली. मुख्यमंत्र्यांनीही जरांगे-पाटलांशी अर्धा तास चर्चा केली. त्यानंतर गुरुवारी शिष्टमंडळ जरांगे-पाटलांच्या भेटीसाठी अंतरवाली सराटीत आले होते.

## न्या. गायकवाड यांची दोन तास चर्चा

सर्व गुन्हे मागे घेतले जातील, असे आश्वासन देण्यात आले, परंतु त्यासाठी देखील एक महिन्याची मुदत असल्याचे जरांगे-पाटलांनी सांगितले. गोळीबार व लाठीचार्जमध्ये जखमी झालेल्या समाज बांधवांच्या उपचाराचा खर्च तत्काळ देण्यावर चर्चा झाली.

## कुणबी नोंदी आढळणाऱ्यांना...

यासाठी विशेष सहकार्य लाभत असल्याचेही शिंदे यांनी स्पष्ट केले. निवृत्त न्यायमूर्ती शिंदे समिती यावर गांभीर्याने काम करत आहे. समितीला सक्षम करण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ आणि यंत्रणा दिली आहे. कोणतीही घाई गडबड न करता नोंदी तपासून जात प्रमाणपत्र देण्यात यावे. मराठा समाजाची फसवणूक किंवा कोणावर अन्याय होणार नाही, याची काळजी घेण्याचे निर्देश समितीला दिले आहेत. युद्धपातळीवर काम करून जात प्रमाणपत्र देण्यात येईल. तसेच क्युरिटिव्ह पीटिशन दाखल करून सर्वोच्च न्यायालयाने मागील वेळेला ज्या त्रुटी आणि निरीक्षणे नोंदवली होती, ती दूर करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. सरकार, निवृत्त न्यायमूर्तींची समिती आणि मागासवर्गीय आयोग यासाठी काम करणार आहे. कोणत्याही समाज घटकावर याचा परिणाम होणार नाही, याची विशेष काळजी घेण्यात आल्याचे शिंदे म्हणाले. मराठा समाजातील तरुणांनी सरकार प्रामाणिकपणे काम करत असताना टोकाचे पाऊल उचलू नये. मुलं-बाळं, कुटुंब, आई-वडिलांना वाऱ्यावर सोडू नका, असे आवाहन शिंदे यांनी केले. मागील काही दिवसांत मराठा आंदोलनाला हिंसक वळण लागले. लोकप्रतिनिधींच्या घरावर हल्ले, जाळपोळ करण्याच्या घटना घडल्या. अनेकांना मारहाण झाली. गालबोट लागल्याने कायदा आणि सुव्यवस्था बिघडल्याने राज्य सरकारने काहींवर गुन्हे दाखल केले. हे गुन्हे मागे घेण्याची जरांगे-पाटील यांची मागणी आहे. मात्र ज्यांच्यावर गंभीर गुन्हे नाहीत, लोकशाही पद्धतीने आंदोलनाचे गुन्हे आहेत ते पडताळणी करून मागे घेण्याची प्रक्रिया पार पाडली जाईल, असेही शिंदे यांनी सांगितले.

## काँग्रेस व विकास एकत्र नांदू शकत नाही : मोदी

भरती केली, अशा शब्दांत मोदी काँग्रेसवर कडाडले. घराणेशाही आणि भ्रष्टाचार हे काँग्रेसचे धोरण आणि परंपरा आहे. पण मोदी आणि भाजपला तुमच्या मुलांची काळजी आहे. त्यामुळेच छत्तीसगडला लुटणाऱ्यांना जनतेने धडा शिकवावा. आतापर्यंतची लूटमार परत घ्यावी, असे आवाहन मोदींनी केले. तुम्ही मला भ्रष्टाचाराविरुद्ध लढण्याचे काम दिले आहे. तुम्ही मला मौजमजा करण्यासाठी सत्तेत बसवले नाही, असेही मोदींनी ठासून सांगितले. देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच एका आदिवासी कन्येला राष्ट्रपती करण्याचा निर्णय भाजपने घेतला. मात्र काँग्रेसने त्यास विरोध केला. विरोधक भाजपच्या विरोधात नव्हे तर आदिवासी मुलीच्या विरोधात होते. छत्तीसगडच्या प्रत्येक आदिवासीने हा अपमान नेहमी लक्षात ठेवला पाहिजे आणि त्याचा बदला काँग्रेसकडून घेतला पाहिजे, असे पंतप्रधान म्हणाले. आपल्या भाषणात काँग्रेसला शिक्षा करणार का? असा सवाल मोदींनी केला. त्यास जनतेने मोठ्या आवाजात होकार दिला.

## 'आशा' ताईची दिवाळी होणार गोड

यांच्यासोबत डॉ. सावंत यांची बैठक झाली. आरोग्य विभागाचे प्रधान सचिव मिलिंद म्हैसकर, आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियानचे संचालक धीरज कुमार, सहसंचालक सुभाष बोरकर, सहसंचालक तुलसीदास सोळंके यांच्यासह आरोग्य विभागातील प्रमुख अधिकारी उपस्थित होते. राज्यात २००७ पासून राष्ट्रीय आरोग्य अभियानअंतर्गत 'आशा सेविका' योजनेची अंमलबजावणी सुरू आहे. सध्या राज्यात ८० हजारांपेक्षा अधिक आशा सेविका कार्यरत आहेत. आजवर सेविकांना ५००० रुपये इतके दर महिना मानधन मिळत होते. यात भरघोस ७००० रुपयांची वाढ करणार असल्याची घोषणा सावंत यांनी केली. केंद्र शासनाकडून ३००० रुपये सेविकांना मानधन मिळते. त्यामुळे आरोग्य मंत्र्यांच्या घोषणेनंतर आशा सेविकांना आता १५ हजार रुपयांचे एकत्रित मानधन मिळणार आहे.

### गट प्रवर्तकांचे मानधन दुप्पट

राज्यात ३६६४ गट प्रवर्तक कार्यरत आहेत. आतापर्यंत ६२०० रुपये मानधन त्यांना मिळत होते. यात दुप्पट वाढ करण्यात आली आहे. तसेच केंद्र शासनाच्या ८७७५ रुपयांचाही समावेश असणार आहे. यामुळे आता गट प्रवर्तकांचे मानधन २१ हजार १७५ रुपये इतके होणार आहे. शिवाय, आशा स्वयंसेविका व गट प्रवर्तक यांना दिवाळी भेट म्हणून २ हजार देण्यात येतील, असे सावंत यांनी सांगितले.

## नाशिकचे प्रख्यात उद्योजक ...

फसवणूक प्रकरणातील गुन्ह्यामुळे व्यथित होत त्यांनी जीवनयात्रा संपवल्याची चर्चा असली, तरी त्यास रात्री उशिरापर्यंत अधिकृत दुजोरा मिळालेला नव्हता. या संदर्भात देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात रात्री उशिरापर्यंत अधिकृत नोंद करण्याचे काम सुरू होते.

# विजयी 'सप्तमी'ने भारत उपांत्य फेरीत

**▌श्रीलंकेचा ५५ धावांत खुर्दा ▌शुभमन गिल, विराट कोहली, श्रेयस अय्यरची अर्धशतके ▌मोहम्मदी शमी, मोहम्मद सिराजचा भेदक मारा**

मुंबई : आघाडीच्या फळीतील फलंदाजांची तीन अर्धशतके आणि वेगवान गोलंदाजांच्या भेदक माऱ्यामुळे भारतीय संघाने (१४ गुण) सलग सातव्या विजयाने विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत धडक मारली. ८ बाद ३५७ धावसंख्येचा पाठलाग करताना श्रीलंकेचा डाव १९.४ षटकांत अवघ्या ५५ धावांवर गडगडला आणि भारतीय संघाने तब्बल ३०२ धावांनी दणदणीत विजयाला गवसणी घातली. तर पराभूत श्रीलंका संघाला पाच पराभवांनी विश्वचषकातून गाशा गुंडाळावा लागला. भारतीय संघाने या विजयाच्या बळावर वानखेडेवरील २०११ विश्वचषकाच्या अंतिम फेरीतील विजयाची पुनरावृत्ती करत श्रीलंकेवर सर्व आघाड्यांनी वर्चस्व राखले.

सलामीवीर शुभमन गिल (९२), विराट कोहली (८८) आणि श्रेयस अययरच्या (८२) अर्धशतकांमुळे भारताने ८ बाद ३५७ अशी शानदार धावसंख्या उभारली. श्रीलंकेचा डावखुरा वेगवान गोलंदाज दिलशान मधुशंकाने पाच बळी घेतले. मात्र, तो धावसंख्येवर लगाम घालू शकला नाही. कर्णधार रोहित शर्मा (४) पहिल्या षटकातील दुसऱ्याच चेंडूवर बाद झाला. पहिल्या धक्क्यानंतर सावरत गिल आणि कोहली यांनी डाव पुढे चालवला. दुष्मंत चमिराने स्वतःच्या गोलंदाजीवर कोहलीला जीवदान दिले. त्यावेळी कोहली १० धावांवर खेळत होता. गिल आणि कोहली या जोडीने लंकेच्या गोलंदाजांवर वर्चस्व गाजवले. गिलने ४९ चेंडूंत विश्वचषकातील दुसरे अर्धशतक झळकावले. भारताचे धावांचे शतक १६ व्या षटकात फलकावर लागले. कोहलीने जीवदानाचा फायदा उचलत ५० चेंडूंत कारकीर्दीतल्या ७० व्या अर्धशतकाला गवसणी घातली. वेगवान गोलंदाज कुसन रजिताला कोहलीने लगावलेला षटकार १०६ मीटरपर्यंतचा होता. ग्लेन मॅक्सवेलनंतर यंदाच्या विश्वचषकातील सर्वाधिक दूरचा षटकार म्हणून याकडे पाहिले जाईल. गिलला विश्वचषकातील पहिले शतक खुणावत होते. मात्र, यष्टिरक्षकाकडे चुकीचा फटका मारत तो नाहक बाद झाला. ११ चौकार आणि २ षटकार त्याने लगावले. गिल व कोहली यांनी दुसऱ्या गड्यासाठी १८९ धावा जोडल्या. कारकीर्दीतल्या विक्रमी ४९ व्या शतकाकडे कूच करणारा कोहलीही मधुशंकाच्या धिम्या चेंडूवर फसला आणि ११ चौकार लगावून परतला. बाद झाल्यावर कोहलीचा चेहरा व खांदे पडले होते. तसेच मैदानातही शांतता पसरली होती. यष्टिरक्षक फलंदाज के. एल. राहुल (२१) आणि सूर्यकुमार यादव (१२) यांना धावगतीला वेग देता आला नाही. मात्र, दुसऱ्या बाजूने श्रेयस अय्यरने एक बाजू लावून धरत



विश्वचषकातील दुसरे अर्धशतक ३६ चेंडूंत पूर्ण केले. त्यानंतर त्याने खेळीचा विस्तार केला. गिल, कोहली बाद झाल्यानंतर श्रेयसकडून शतकाची अपेक्षा बाळगण्यात येत होती. मात्र, मधुशंकाच्या बाहेर जाणाऱ्या चेंडूवर तो आपला बळी देऊन गेला. ६ षटकार आणि ३ षटकारांनी त्याने आपल्या खेळीला आकार दिला. रवींद्र जडेजासोबत त्याने सहाव्या गड्यासाठी ३६ चेंडूंत झटपट ५७ धावा जोडल्या. जडेजाने २४ चेंडूंत प्रत्येकी एक चौकार व एक षटकाराने ३५ धावांची भर घातली.

जसप्रित बुमराहने पहिल्याच चेंडूवर पुथूम निसंकाला भोपळ्यावर पायचीत पकडले. त्याचा जोडीदार मोहम्मद सिराजने दुसऱ्या षटकात श्रीलंकेला दोन धक्के देत दिमुथ करुणारत्ने (०) आणि सदिरा समरविक्रमाला (०) माघारी धाडले. कर्णधार कुशल मेंडिसने (१) निर्णायक लढतीत निराशा केली. चरिथ असलंकाच्या (१४) स्वरुपात श्रीलंकेने निम्मा संघ ९.३ षटकांत गमावला. तळाच्या फलंदाजांमुळे श्रीलंकेचे धावांचे अर्धशतक फलकावर कसेबसे लागले. भारताच्या वेगवन गोलंदाजांचा मारा एवढा तिखट होता की, श्रीलंकेच्या केवळ तीन फलंदाजांनाच दुहेरी धावसंख्या उभारता आली. मोहम्मद शमीने विश्वचषकात दुसऱ्यांदा ५ बळी घेत श्रीलंकेवर एकतर्फी विजय मिळवून देण्यात मोलाचे योगदान दिले. सिराजने ३ फलंदाजांना माघारी धाडले, तर बुमराह आणि रवींद्र जडेजाला एका बळीवर समाधान मानावे लागले.

## गुंतवणूकदारांनी एका ...

त्यामुळे गुरुवारी गुंतवणूकदारांमध्ये उत्साह दिसून आला. चौफेर खरेदीमुळे शेअर बाजाराच्या मजबुतीला आधार मिळाला. बाजारातील आलेल्या तेजीत गुंतवणूकदारांनी मोठा नफा कमावला. खरेदीमुळे मुंबई शेअर बाजारात नोंदणी असलेल्या कंपन्यांचे बाजार भांडवल ३.२२ लाख कोटी रुपयांनी वाढून ३१३.४४ लाख कोटी रुपये झाले, जे बुधवारी बाजार बंद झाल्यानंतर ३१०.२२ लाख कोटी रुपये होते. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर गुंतवणूकदारांच्या संपत्तीमध्ये सुमारे ३.२२ लाख कोटी रुपयांची वाढ झाली.

**TENDER NOTICE**

**200 KVA Transformer**

The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project. Gutti Agro Farmar Producer CO. Ltd. is one of the beneficiaries of the project and is inviting offline bids for the above mentioned machinery. The bid document is available on the project website : **www.smart-mh.org**, in the tender and procurement section. The last date for submission of offline bids is 17/11/2023 up to 3.00 PM. Any updates or notices shall be published on the afore mentioned website only.

**Gutti Agro Farmer Producer Co. Ltd.**
**At. Post Gutti, Tq. Jalkot, Dist. Latur**

**मालेगाव महानगरपालिका, मालेगाव**
**पाणी पुरवठा विभाग**
**जाहीर ई-निविदा सूचना क्र./पापुवि/०४/२०२३-२४**

मा. आयुक्त, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव पाणी पुरवठा विभागाकडील ०२ कामांची जाहीर ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर जाहिर ई-निविदा सूचना म. शासनाच्या http//www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. निविदा सूचनेत कामासंबंधी संपूर्ण माहिती वरील संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. सदरचे ०२ कामासंबंधी सर्व अटी / शर्ती निविदा फॉर्म सोबत आहे. सदर कामासाठी आवश्यक माहिती उप अभियंता पा.पु.वि. यांचे कार्यालयाकडून प्राप्त करता येईल.

दिनांक : ३१/१०/२०२३ ते १६/११/२०२३

सही /-
**आयुक्त**
**मालेगाव महानगरपालिका, मालेगाव**

जा.क्र./मामनपा/पापु/२५६/२०२३
दिनांक ३०/१०/२०२३

**श्री व्यंकटेश रिफाइनरीज लिमिटेड**
SHRI VENKATESH REFINERIES LIMITED
(CIN : U15140MH2003PLC139397)
नोंद. कार्या. : गट क्र. १६, उमरेड, एरंडोल, जळगाव, महाराष्ट्र
३० सप्टेंबर २०२३ रोजी समाप्त तिमाही आणि अर्धवर्षासाठी अलेखापरीक्षित निष्कर्षांचे विवरणपत्र
(भारतीय रु. लाखात)

| | तपशील | ३०.०९.२०२३ रोजी समाप्त अर्धवर्षाकरिता | ३१.०३.२०२३ रोजी समाप्त अर्धवर्षाकरिता | ३०.०९.२०२२ रोजी समाप्त अर्धवर्षाकरिता | ३१.०३.२०२३ रोजी समाप्त वर्षाकरिता |
|---|---|---|---|---|---|
| | | पुनर्विलोकन | लेखापरीक्षित | पुनर्विलोकन | लेखापरीक्षित |
| १ | प्रचलनामधून महसूल | २८७२८.९३ | ३०५२६.१२ | ३२३८६.११ | ६२९१२.२३ |
| २ | इतर उत्पन्न | ९.५१ | ३.३७ | ३९.०८ | ४२.४५ |
| ३ | एकूण महसूल (१+२) | २८७३८.४४ | ३०५२९.४९ | ३२४२५.१९ | ६२९५४.६८ |
| ४ | खर्च | | | | |
| | वापरलेल्या सामग्रीचे मूल्य | २९०३४.९१ | २६८३०.४२ | २३७७०.०२ | ५०६००.४४ |
| | व्यवसायामधील स्टॉकची खरेदी | ९३४.१७ | २९७४.१८ | ८७६३.९० | ११७३८.०८ |
| | तयार मालाच्या, प्रगतिपथावरील कामाच्या आणि व्यवसायामधील स्टॉकच्या मोजदादीमधील बदल | -३१२१.१३ | -१०२२.७६ | -१८७२.३८ | -२८९५.१४ |
| | कर्मचारी लाभ खर्च | ३०.०८ | ३०.२६ | २७.१८ | ५७.४४ |
| | वित्त खर्च | ५२७.६१ | ४५५.९३ | ३३१.०७ | ७८६.९९ |
| | घसारा आणि कर्जफेडीचा खर्च | ५०.१२ | ५७.५९ | ४१.९४ | ९९.५२ |
| | इतर खर्च | २७७.४१ | ३२४.२२ | ३०९.०९ | ६३३.३१ |
| ५ | एकूण खर्च (४) | २७७३३.१६ | २९६४९.८३ | ३१३७०.८२ | ६१०२०.६५ |
| ६ | अपवादात्मक आणि असाधारण बाबी आणि करपूर्व नफा/तोटा (३-५) | १००५.२८ | ८७९.६६ | १०५४.३७ | १९३४.०३ |
| ७ | अपवादात्मक बाबी | ०.०० | ०.०० | | ०.०० |
| ८ | असाधारण बाबी आणि करपूर्व नफा/तोटा | | | | |
| ९ | कर खर्च | | | | |
| | (१) चालू कर | २५९.०९ | २३१.७७ | २६५.६७ | ४९७.४४ |
| | (२) एमएटी क्रेडिट | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | (३) अगोदरच्या वर्षाच्या संबंधित चालू कर खर्च | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | (४) स्थगित कर | ६.६२ | ०.२४ | २.८४ | ३.०८ |
| १० | वर्षासाठी नफा (८-९) | ७३९.५७ | ६४७.६४ | ७८५.८६ | १४३३.५१ |
| ११ | भरणा झालेले भागभांडवल | ११०५.९७ | ११०५.९७ | ११०५.९७ | ११०५.९७ |
| १२ | प्रतिसमभाग कमाई (टीप ४ पाहा) | | | | |
| | (अ) मूलभूत | ३.३४ | २.९३ | ३.५५ | ६.४८ |
| | (ब) सोम्यीकृत | ३.३४ | २.९३ | ३.५५ | ६.४८ |
| १३ | ऋण समदृष्टी गुणोत्तर | २.२४ | १.४७ | १.५९ | १.४७ |
| १४ | ऋण सेवा समाविष्ट बाबी गुणोत्तर | २.२१ | २.१७ | २.२६ | ३.८१ |
| १५ | व्याज समाविष्ट बाबी गुणोत्तर | २.९१ | २.९३ | ४.१८ | ३.४६ |

टीप :
१. एमसीएच्या १६ फेब्रुवारी २०१५ दिनांकित अधिसूचनेनुसार, सेबी (इश्यू ऑफ कॅपिटल अॅण्ड डिस्प्लोजर रिक्वायरमेंट) रेग्युलेशन, २००९ च्या चॅप्टर एक्सबीमधील संदर्भानुसार एसएमई एक्स्चेंजवर ज्यांचे शेअर्स सूचिबद्ध आहेत, त्यांना आयएनडी एएस स्वीकारण्याच्या अनिवार्य आवश्यकतेमधून शिथिलता देण्यात आली आहे, कारण कंपनी शिथिलता क्षेणीमध्ये येते, त्यांनी वित्तीय निष्कर्ष तयार करण्यासाठी आयएनडी एएस स्वीकारलेली नाही.
२. कंपनीचा प्रमुख व्यवसाय सोयाबीन तेल, सरकीचे तेल, खाद्य तेल, जेवणाच्या तेलाचे शुद्धीकरण आणि त्याची विक्री आणि त्यांची उपउत्पादन आणि मुख्य व्यवसायासंबंधित इतर कामकाज हा आहे. त्यामुळे कंपनीज (अकाऊंटिंग स्टँडर्ड्स) रूल्स, २०१४ अंतर्गत अधिसूचित एएस १७ ''सेगमेंट रिपोर्टिंग'' अनुसार सांगण्यायोग्य कोणतेही सेगमेंट्स नाहीत आणि म्हणूनच कोणताही वेगळा सेगमेंट रिपोर्ट दिलेला नाही.
३. कंपनीच्या वैधानिक लेखापरीक्षकांनी सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अॅण्ड डिस्प्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ च्या अटींच्या अनुपालनामध्ये ३१ मार्च २०२३ रोजी समाप्त अर्धवर्ष आणि वर्षाच्या वित्तीय निष्कर्षांचे लेखापरीक्षण केले. उपरोक्त वित्तीय निष्कर्ष लेखापरीक्षित केले आणि लेखापरीक्षण समितीने शिफारस केली आणि त्यानंतर संचालक मंडळाने त्यांच्या ३० ऑक्टोबर २०२३ रोजी झालेल्या सभेमध्ये मंजुरी दिली.
४. मागील कालावधी/वर्षाच्या संख्या, चालू कालावधी/प्रस्तुतीच्या तुलनात्मकतेसाठी जेथे तसे करणे आवश्यक वाटले, तेथे पुनर्गठित, पुनर्लिखित आणि पुनर्वर्गीकृत करण्यात आल्या आहेत.
५. सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अॅण्ड डिस्प्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत उपरोक्त निष्कर्ष स्टॉक एक्स्चेंजेसकडे दाखल करण्यात आले आहेत आणि स्टॉक एक्स्चेंजेसच्या आणि कंपनीच्या संकेतस्थळावरही उपलब्ध आहेत.
६. ३१ मार्च २०२३ रोजी समाप्त वर्षादरम्यान पूर्ण केलेल्या इन्व्हेंटरीची स्थिती खालीलप्रमाणे आहेत :
उपरोक्त कालावधीच्या प्रारंभी प्रलंबित ०
उपरोक्त कालावधीदरम्यान प्राप्त ०
उपरोक्त कालावधीदरम्यान विल्हेवाट ०
उपरोक्त कालावधी समाप्तीपर्यंत निराकरण न झालेले ०

स्थळ : जळगाव
दिनांक : ०२.११.२०२३

श्री व्यंकटेश रिफाइनरीज लिमिटेड
हस्ता./-
दिनेश गणपत कबरे
व्यवस्थापकीय संचालक

**निवडणूक निर्णय अधिकारी,**
एम.ई.एस. इंडस्ट्रीयल वर्कर्स को-ऑप. क्रेडिट सोसायटी, पुणे २७ ब, बुधवार पेठ, पुणे- ४११००२.
**संचालक मंडळ निवडणूक २०२३-२४ ते २०२८-२९**

उपरोक्त संस्थेच्या नमूद कालावधीच्या निवडणुकीकरिता संस्थेच्या अंतिम मतदार (अ.क्र. १ ते १४२५) यादीत समाविष्ट मतदारांना कळविण्यात येते की, सदर संस्थेचे मतदान दिनांक ०५/११/२०२३ रोजी सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत खालील नमूद ५ केंद्रांवर होणार आहे. मतमोजणी फडके हॉल, १७८५, सदाशिव पेठ, पुणे -३० येथे दिनांक ०६/११/२०२३ रोजी सकाळी ९.०० पासून ते संपेपर्यंत पार पाडली जाईल.

| अ. क्र. | मतदान केंद्र ठिकाण | मतदान केंद्र | अंतिम मतदार यादीतील सभासद क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | पुणे विद्यार्थी गृह, १७८६, सदाशिव पेठ, पुणे-३० | केंद्र क्र.१<br>केंद्र क्र. २ | १ ते ९३०<br>१४१६ ते १४२३ |
| २ | एमई क्लब हाऊस, अहमदनगर किल्ल्याजवळ, नगर-पाथर्डी रोड, अहमदनगर ४१४००२ | केंद्र क्र. ३ | ९३१ ते १०८७, १४२४ |
| ३ | चेतना हॉल, एम. ई. एस. कॉम्प्लेक्स देवळाली कॅम्प, नाशिक ४२२४०१ | केंद्र क्र. ४ | १०८८ ते १३१४, १४०२ ते १४१५, १४२५ |
| ४ | युनियन ऑफिस गॅरिसन इंजिनिअर पुलगाव, सीएडी कॅम्प पुलगाव, ता. देवळी, जि. वर्धा ४४२३०३ | केंद्र क्र. ५ | १३१५ ते १४०१ |

जा.क्र.निनिअ/एम.ई.एस.इंडस्ट्रीयल वर्कर्स.लि./जाहीर प्रगटन/१६/२०२३
दिनांक : ०१/११/२०२३
शिक्का
सही/- (नीलम पिंगळे)
निवडणूक निर्णय अधिकारी,
एम.ई.एस.इंडस्ट्रीयल वर्कर्स को-ऑप. क्रेडिट सोसायटी, बुधवार पेठ, पुणे ०२

महा मेट्रो
PUNE METRO
**महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि.**
(भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांचा संयुक्त उपक्रम)
**पुणे मेट्रो रेल प्रकल्प**
ब्लॉक क्रमांक A3, दिवाणी न्यायालय मेट्रो स्टेशन, न्यायमूर्ती रानडे पथ, पुणे-४११००५. दूरध्वनी: ०२०-७४१०००४०६७ / ६८
E-mail: tenders.pmrp@mahametro.org | www.punemetrorail.org

**निविदा सूचना क्रमांक P1PD-24/2023. दि. ०३/११/२०२३**

**कामाचे स्वरुप:** पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या मार्गिका-१ आणि मार्गिका-२ च्या मेट्रो स्थानकांवर १०० चौ. मीटर पेक्षा कमी क्षेत्रफळ असलेल्या जागेचा (०९ वर्षांच्या कालावधीसाठी) व्यवसायाकरीता परवाना देणे बाबत निविदा.

निविदा सूचना पाहण्यासाठी, इच्छुक बोलीदार www.punemetrorail.org या वेबसाइटला भेट देऊ शकतात. बोली कागदपत्रे डाउनलोड करा आणि महा-मेट्रोच्या https://mahametrorail.etenders.in या ई-निविदा पोर्टलवरून दिनांक ३/११/२३ रोजी १७.०० वाजेपासून ते ५/१२/२३ रोजी १६.०० वाजेपर्यंत निविदा संबंधी अधिक तपशील मिळवा.

महाव्यवस्थापक (टीपी आणि प्रोक्योरमेंट-पीडी)
महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड.

Pune Metro : City's Transport Solution

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
**ई-निविदा सूचना क्र./१४/सन २०२३-२०२४**

खालील कामांकरिता योग्य त्या वर्गामध्ये नोंदणीकृत/अनोंदणीकृत कंत्राटदारांकडून ई-निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रुपये | ई-निविदा संकेतस्थळावर उपलब्ध होण्याचा कालावधी (www.midcindia.org) पासून | पर्यंत |
|---|---|---|---|---|
| अ | **का. अ. मऔविम, स्थापत्य विभाग, छत्रपती संभाजीनगर** | | | |
| १ | अतिरिक्त शेंद्रा (जयपूर) औद्योगिक क्षेत्र... जयपूर औद्योगिक क्षेत्रातील विकास कामे. | ३१,६११५,३७७.०० | १६/११/२०२३ | १३/१२/२०२३ |
| २ | पैठण औद्योगिक क्षेत्र... औद्योगिक क्षेत्राच्या हद्दीमध्ये गावकऱ्यांसाठी भूखंड क्र. आणि डी-७ लगत रस्त्यांचे बांधकाम करणे. | ३,०८,४१,६४०.०० | १६/११/२०२३ | ०५/१२/२०२३ |
| ३ | जालना औद्योगिक क्षेत्र... रस्ते देखभाल व दुरूस्ती अंतर्गत... जालना औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र. ३ मध्ये खड्डे बुजविणे व रस्त्याला पुनरूत्थान करणे. (**दुसरी मागणी**) | ४०,२३,९२९.०० | ०६/११/२०२३ | १६/११/२०२३ |
| ४ | छत्रपती संभाजीनगर आणि चिकलठाणा औद्योगिक क्षेत्र.. निवासी व अनिवासी इमारतीची देखभाल व दुरूस्ती अंतर्गत, मऔविम इमारतीची साफसफाई करणे. (२०२३-२०२४) | ४०,०२,४८६.०० | ०६/११/२०२३ | २२/११/२०२३ |
| ५ | औरंगाबाद औद्योगिक क्षेत्र... निवासी इमारत देखभाल व दुरूस्ती अंतर्गत... कर्मचारी वसाहतीमधील जुन्या इमारतींचे नूतनीकरण किरकोळ कामे करणे. (**दुसरी मागणी**) | ३९,९८,२५८.०० | ०६/११/२०२३ | १६/११/२०२३ |
| ६ | पैठण औद्योगिक क्षेत्र... जलशुध्दीकरण केंद्र अग्निशमन केंद्र व रस्ते देखभाल व दुरुस्ती अंतर्गत जलशुध्दीकरण केंद्र, अग्निशमन केंद्र व रस्त्यांची वार्षिक साफसफाई करणे. | १५,९५,४००.०० | ०६/११/२०२३ | २२/११/२०२३ |
| ७ | जालना औद्योगिक क्षेत्र... अनिवासी इमारत देखभाल व दुरूस्ती अंतर्गत... जालना औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र. १ मध्ये जुने जलकुंभ, पंपहाऊससहित व फिल्टर हाऊस पाडणे. | २,९२,१०१.०० | ०६/११/२०२३ | २२/११/२०२३ |
| ब | **का.अ. मऔविम, विभाग, नाशिक** | | | |
| १ | नाशिक (सातपूर) औद्योगिक क्षेत्र... नाशिक (सातपूर), सिन्नर, विंचूर, अतिरिक्त दिंडोरी, मालेगाव (सायने) आणि मालेगाव (अजंग-रावळगाव) पाणीपुरवठा योजना देखभाल व दुरूस्ती... नाशिक आणि सिन्नर जलशुध्दीकरण केंद्र येथे ९०० किलो ग्रॅम कंटेनरमध्ये द्रवरूप क्लोरीन गॅसचा तसेच विंचूर आणि अतिरिक्त दिंडोरी जलशुध्दीकरण केंद्र येथे १०० किलो ग्रॅम द्रवरूप क्लोरीन गॅस सिलिंडरचा पुरवठा करणे (Chlorine gas as per IS 646-1970) (**दुसरी मागणी**) | ९,३६,४७०.०० | ०६/११/२०२३ | १६/११/२०२३ |
| क | **का.अ. मऔविम, विभाग, धुळे** | | | |
| १ | नंदुरबार (भालेर) औद्योगिक क्षेत्र... कायमस्वरूपी पाणीपुरवठा योजने अंतर्गत जॅकवेल येथे (EOT) क्रेनचा पुरवठा, उभारणी व चाचणी करणे. | ३७,५५,०००.०० | ०६/११/२०२३ | २२/११/२०२३ |
| २ | जळगाव औद्योगिक क्षेत्र आणि भुसावळ विकास केंद्र पाणीपुरवठा देखभाल व दुरुस्ती.. सन २०२३-२०२४ साठी पाणीपुरवठा योजनेची विविध कामे करणे. | २८,५२,१७८.०० | ०६/११/२०२३ | २२/११/२०२३ |
| ३ | जळगाव औद्योगिक क्षेत्र... रस्त्याची देखभाल व दुरूस्ती अंतर्गत... रस्त्याच्या कडेने, मोकळी जागा व ॲमिनिटीमधील अतिक्रमण व चहाचे स्टॉल काढणे (वार्षिक कामे (**तिसरी मागणी**) | २६,२२,१८०.०० | ०३/११/२०२३ | ०९/११/२०२३ |
| ४ | जळगाव जळगाव औद्योगिक क्षेत्र आणि भुसावळ विकास केंद्र पाणीपुरवठा देखभाल व दुरुस्ती... सन २०२३ - २०२४ साठी क्लोरिनेटर आणि क्लोरीन लिक ॲबसॉर्बशन सिस्टीमची वार्षिक देखभाल व दुरूस्तीची कामे करणे. | २३,८५,८५०.०० | ०६/११/२०२३ | २२/११/२०२३ |
| ५ | जामनेर औद्योगिक क्षेत्र... रस्त्यांची वार्षिक देखभाल व दुरूस्ती ... सन २०२३-२०२४ करिता जामनेर औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांची दुरूस्ती करणे. (**तिसरी मागणी**) | १५,९४,८९३.०० | ०३/११/२०२३ | ०९/११/२०२३ |
| ६ | जळगाव औद्योगिक क्षेत्र .. पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती .. एम विभागातील पाण्याची पाईपलाईन बदलविणे. (**तिसरी मागणी**) | २,४०,८२०.०० | ०३/११/२०२३ | ०९/११/२०२३ |
| ड | **का.अ. मऔविम, विभाग, नांदेड** | | | |
| १ | हिंगोली औद्योगिक क्षेत्र... औद्योगिक क्षेत्राची कायमस्वरूपी पाणीपुरवठा योजना... हिंगोली औद्योगिक क्षेत्रामध्ये २ द.ल.लि. क्षमतेच्या जलशुध्दीकरण केंद्राची बांधणी व इतर अनुषंगिक कामे करणे. | ८,९३,५७,०४४.०० | ०९/११/२०२३ | ०५/१२/२०२३ |
| २ | नांदेड औद्योगिक क्षेत्र... वार्षिक देखभाल व दुरूस्ती अंतर्गत नांदेड औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांची दुरूस्ती व इतर किरकोळ कामे करणे. | १५,८६,०४८.०० | ०६/११/२०२३ | २२/११/२०२३ |
| ३ | परभणी औद्योगिक क्षेत्र... दुरूस्ती व देखभाली अंतर्गत अनिवासी इमारत व म.औ. वि. महामंडळाच्या परभणी कार्यालयाच्या इमारतीचे दुरूस्ती व रंगकाम करणे. | १३,६४,९०६.०० | ०६/११/२०२३ | २२/११/२०२३ |
| ४ | परभणी, जिंतूर व गंगाखेड औद्योगिक क्षेत्रे... औद्योगिक क्षेत्रामधील रस्त्यांवरील दिवाबत्तीची वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे व इतर किरकोळ कामे करणे. | १२,६७,४०८.०० | ०६/११/२०२३ | २३/११/२०२३ |
| ५ | हिंगोली, बसमत व कळमनुरी औद्योगिक क्षेत्रे... औद्योगिक क्षेत्रामधील रस्त्यांवरील दिवत्तीची वार्षिक देखभाल व दुरूस्ती करणे व इतर किरकोळ कामे करणे. | १०,२३,३८०.०० | ०६/११/२०२३ | २३/११/२०२३ |
| ६ | परभणी औद्योगिक क्षेत्र... पाणीपुरवठा योजना देखभाल व दुरूस्ती... परभणी औद्योगिक क्षेत्रातील जमिनीवरील साठवण टाकीकडे जाण्यासाठी रस्त्याचे बांधकाम करणे. | ३,९४,५५४.०० | ०६/११/२०२३ | २२/११/२०२३ |

निविदा सूचना अगर निविदा सूचनेतील कोणताही भाग कोणतीही पूर्वसूचना न देता रद्द करण्याचा अथवा राखून ठेवण्याचा तसेच सुधारणा करण्याचा हक्क म.औ.वि. महामंडळाने राखून ठेवला आहे.

**रावेर नगरपरिषद कार्यालय, ता.रावेर, जि.जळगाव**
Raver Municipal Council, Tal. Raver, Dist. Jalgaon
Email ID:ravernp@gmail.com Tel No.०२५८४-०२५०३५०
जा.क्र.रानपा/करवि/१७४७/२०२३-२४ दि.२ नोव्हेंबर २०२३

**जाहीर लिलाव सुचना**

तमाम व्यापारी, व्यावसायिक, नागरीकांना कळविण्यात येते की, रावेर नगरपरिषद मालकीच्या बहुउद्देशिय सभागृह महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ९२ (३) नुसार ३ (तीन) वर्षाच्या तात्पुरत्या भोगवट्याने द्यावयाचे आहे.

सदर लिलावाचा तपशिल खालील प्रमाणे :-

१. जाहीर लिलाव प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ इच्छित असलेल्या लिलावधारकांना न.पा. कार्यालयात माहितीचा तपशिल उपलब्ध आहे.

२) जाहीर लिलावात भाग घेणाऱ्यांनी प्रथम अनामत रक्कम रु.५०,०००/- चा DD/चेक/रोख स्वरुपात नगरपालिका कार्यालयात भरणा केल्या शिवाय लिलावात भाग घेता येणार नाही. तसेच अनामत रक्कम सोबत मालमत्ता कर व पाणीपट्टी रकमा चालु वर्षासह भरणा केलेल्या पावत्या सोबत जोडाव्यात.

३. बहुउद्देशिय सभागृह जाहीर लिलाव करावयाचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ. क्र. | वर्णन | ठिकाण | नगरपालिकेस अपेक्षित अधिमुल्य नापरतावा अनामत | सुरक्षा अनामत डी.डी./रोख स्वरुपात | लिलावाची तारीख/वेळ |
|---|---|---|---|---|---|
| A | B | C | D | E | F |
| १ | बहुउद्देशिय सभागृह | न.प.पॉवर हाऊस जवळ | १,१९,१३,६२० | ५०,००० | दि.०७/११/२०२३ दुपारी ०३.०० वाजता |

सदर गाळ्यांचे रकाना D मधील रक्कम नगरपरिषदेस अपेक्षित नापरतावा अनामत रक्कम आहे. अपेक्षित रकमेपेक्षा कमी बोली प्राप्त झाल्यास सदर लिलाव अमान्य करण्यात येईल.

(स्वालिहा मालगावे)
मुख्याधिकारी
रावेर नगरपरिषद, रावेर

शिक्का

(कैलास कडलग)
प्रशासक
रावेर नगरपरिषद, रावेर

ऑफर
घरा घरात... मना मनात...
पुण्य नगरी
ऑफर
**APPOINTMENT**
ऑफर साईज १० X ८ Sq.Cm.
**आता सवलतीच्या दरात**

| | |
|---|---|
| उत्तर महाराष्ट्र | रु. ५०००/- |
| मुंबईसह कोकण विभाग | रु. ५०००/- |
| मराठवाडा विभाग | रु. ५०००/- |
| पश्चिम महाराष्ट्र | रु. ५०००/- |
| विदर्भ | रु. ५०००/- |
| कोणतेही दोन विभाग | रु. ७५००/- |
| कोणतेही तीन विभाग | रु. ११५००/- |
| कोणतेही चार विभाग | रु. १५५००/- |
| संपुर्ण महाराष्ट्र | रु. १९५००/- |

वरील जाहिरातीच्या रकमेवर ५ % जीएसटी कर वेगळा द्यावा लागेल.
हे दर एप्रिल २०२३ पासून लागू.
स्पेशल दिवस : बुधवार/शनिवार
जाहिरातीसाठी फक्त एक मिस कॉल करा
18002081019
E-mail:customercare@sapp.in